पीएच.डी.

संशोधन आराखडा

"कंधार व मुखेड तालुक्यातील भूमी उपयोजन व कृषी प्रारूपाचा तुलनात्मक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत, भूगोल विषयातील पीएच. डी. (विद्या वाचस्पती)

या पदवीकरिता सादर केल्या जाणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

वाघमारे गणपती शंकर

एम.ए., एम.एड., एम.फिल, नेट

मार्गदर्शक

प्रा.डॉ.नागरगोजे अशोक उमराव

एम.ए., बी.एड., सेट, पीएच.डी.

सहाय्यक प्राध्यापक, भूगोल विभाग

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

: संशोधन केंद्र :

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,उदगीर जि.लातूर.

(महाराष्ट्र)

एप्रिल, 2019

“कंधार व मुखेड तालुक्यातील भूमी उपयोजन व कृषी प्रारूपाचा तुलनात्मक अभ्यास”

१.१ प्रस्तावना

प्राचीन काळात मानव प्राथमिक अवस्थेत जीवन जगत असताना शिकार व मासेमारी करून उदरनिर्वाह करीत होता. शिकारीच्या अवस्थेत मानवी जीवन भटके व अस्थिर स्वरूपाचे होते. या भटक्या स्वरूपात जीवन जगत असताना मानव पशुपालनाबरोबरच कृषी करू लागला. यातूनच कृषीचा उदयास झाला. मानवाच्य ज्ञानाच्या कुशलतेनुसार कृषीचा विकास आज एकविसाव्या शतकात देखील होताना दिसतो.

१.२ कृषी आणि कृषि भूगोलाचा अर्थ

‘कृष’ म्हणजे नांगरणे. या धातुपासून ‘कृषी’ शब्द बनला आहे. जमीन नांगरून तिच्यात बी पेरणे आणि पेरलेल्या बियांची व त्यांच्या रोपाची काळजी वाहून त्यांच्यापासून धान्य मिळविणे म्हणजे शेती (कृष) किंवा कृषी होय.

कृषी भूगोल या शब्दाचे मूळ ग्रीक व लॅटीन भाषेत सापडते. Geography हा शब्द ग्रीक भाषेतील असून तो Geogaphia या शब्दापासून बनला आहे. Geo म्हणजे Earth आणि Graphia म्हणजे To describe म्हणजे Geography याला Description of the Earth असे म्हणता येईल. तसेच Agricultural हा शब्द लॅटीन भाषेतील Agricultura या शब्दापासून बनलेला असून Ager म्हणजेच A Field आणि Cultura म्हणजेच to culture आणि Cultivate या शब्दापासून बनलेला आहे. म्हणजेच Agriculture means cultivation of a field असे म्हणता येईल.

१.३ कृषीचा उगम

कृषी हा मानवाचा सर्वांत प्राचीन व्यवसाय असला तरी शेतीचा उगम केव्हा, कसा व कुठे झाला याबाबत खात्रीपूर्वक सांगता येत नाही. विविध शास्त्रज्ञांनी व अभ्यासकांनी याविषयी प्रयत्न केले पण म्हणावे तेवढे यश हाती लाभलेले दिसत नाही. शेतीच्या उगमाविषयी एवढे

म्हणता येईल. शेतीचा विकास मानवाच्या प्रयत्न, जिज्ञासा व अंदाज यातून झाला आहे. म्हणून शेतीचा निर्माता मानव आहे असे म्हणता येईल.

१.४ शेतीच्या उगमस्थानाचे प्रदेश

जगात शेतीची सुरुवात पुढील दोन प्रदेशात झाली.

१) जुन्या जगातील कृषी आरंभस्थाने

२) नव्या जगातील कृषीची उगमस्थाने

१.५ शेतीचे प्रकार

पृथ्वीच्या पृष्ठभागावर कृषीचे विविध प्रकार दिसतात. त्यात निर्वाहशेती, व्यापारी अन्नधान्याची शेती, मिश्र शेती, मळ्याची शेती, दुग्धशेती, ट्रकशेती इ.

१.६ कृषी प्रारूप

कृषीचे नियम व विभाग पाहण्यासाठी खालील वेगवेगळ्या निकषाचा वापर करून कृषी विभाग पाडलेले जातात व त्याबरोबरच कृषीवर परिणाम करणारे घटक आणि या घटकांमध्येच परस्पर चालणाऱ्या क्रिया व त्याचे विश्लेषण करण्यासाठी कृषी विभाग पाडून खालील विश्लेषण सुलभपणे करता येते.

अ) पीक प्रारूप

ब) पीक केंद्रीकरण

क) पीक विविधता

ड) पीक संयोग

इ) कृषी उत्पादकता

१.७ अभ्यास क्षेत्र

सदरील संशोधनासाठी संशोधकाने नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यांपैकी कंधार व मुखेड या दोन तालुक्याची निवड केली असून २००८ ते २०१८ पर्यंतच्या या दहा व दहा वर्षांची आकडेवारी घेतली जाणार आहे. प्रत्येक तालुक्यातील मंडळनिहाय १३ पिके निवडून अभ्यासासाठी घेतली जाणार आहेत.

नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यातील कंधार हा एक ऐतिहासिक तालुका म्हणून त्याची ओळख आहे. कंधार तालुक्याचे स्थान ७७°१५' पुर्व ते ७७°४५' पूर्व अक्षवृत्त तर रेखावृत्तीय विस्तार १८°१५' पूर्व ते १८°४५' उत्तर इतका आहे. या तालुक्याच्या पुर्वेस नायगाव तालुका, दक्षिणेस मुखेड तर पश्चिमेस व उत्तरेस लोहा तालुका व्यापलेला दिसून येतो. तर नैऋत्येस लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्याची सीमा कंधार लगत आहे.

मुखेड तालुक्याचे भौगोलिक स्थान उत्तर गोलार्धात १८°२८' उत्तर ते १८°४७' उत्तर अक्षांश तर ७७°१०' पूर्व रेखावृत्तीय विस्तार आहे. मुखेड तालुक्याचे सापेक्ष स्थान पाहत असताना मुखेड तालुका नांदेड जिल्ह्याच्या दक्षिणेस ७९ कि.मी. अंतरावर वसलेला आहे. पूर्वेस बिलोली तालुका तर पश्चिमेस लातूर जिल्ह्यातील जळकोट, उदगीर या तालुक्याच्या सीमा आहेत. तसेच उत्तरेस कंधार तालुका तर दक्षिणेस देगलूर तालुक्याची सीमा आहे.

१.८ अभ्यासाची उद्दिष्ट्ये

१) कंधार व मुखेड तालुक्याच्या प्राकृतिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक रचनेचा अभ्यास करणे.

२) कंधार व मुखेड तालुक्यातील भूमी उपयोगाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३) कंधार व मुखेड तालुक्यातील मंडळनिहाय पीक प्रारूपाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

४) कंधार व मुखेड तालुक्यातील मंडळनिहाय पीक निर्देशांकाचा अभ्यास करणे.

५) कंधार व मुखेड तालुक्यातील पीक केंद्रीकरणाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

६) कंधार व मुखेड तालुक्यातील पीक विविधतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

७) कंधार व मुखेड तालुक्यातील पीक संयोगाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

८) कंधार व मुखेड तालुक्यातील पीक उत्पादकतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

१.९ अभ्यास पद्धती

कंधार व मुखेड तालुक्यातील भूमी उपयोग कृषी प्रारूपाचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी आकडेवारी व माहिती संकलनासाठी पुढील साहित्य व साधन सामुग्रीचा अवलंब केला जाणार आहे.

अ) प्राथमिक स्त्रोत

कंधार व मुखेड तालुक्यातील भूमी उपयोगाचा अभ्यास करण्यासाठी पुढील प्राथमिक स्त्रोताआधारे घेतला जाणार आहे. जिल्हा सांख्यिकीय कार्यालय, तहसील कार्यालय, कृषी कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय व विविध विभागातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधून चर्चेच्या आधारे माहिती संकलित केली जाणार आहे.

ब) दुय्यम स्त्रोत

सदर संशोधनासाठी प्राथमिक सामग्री बरोबरच दुय्यम सामग्रीचाही वापर करण्यात येणार आहे. याविषयीची अधिकची माहिती मिळविण्यासाठी शासकीय-निमशासकीय कार्यालयातील अहवाल, माहिती पुस्तिका गॅझेटिअर्स, पुस्तके, मासिके, वृत्तपत्र लेखन, इंटरनेट इत्यादी साधनांद्वारे माहिती विश्लेषण केले जाणार आहे.

१.१० आकडेवारी संकलन

सदरील संशोधनात सांख्यिकीय नकाशाचा वापर करून भूमी उपयोगाचे वितरण व कृषी प्रारूप, वेगवेगळे जिल्हे, तालुक्यातील भौगोलिक विभाग करण्यासाठी व मंडळनिहाय माहिती दर्शविण्यासाठी भाटिया, जसबीरसिंग, जे.सी. व्हिवर, रफिउल्लाह, थॉमस इ. सुत्राचा अवलंब केला जाणार आहे.

१.११ साहित्याचे पुनरावलोकन

प्रस्तुत विषयाच्या अभ्यासात महत्त्वाचा 'भूमी उपयोग, कृषी प्रारूप यांचा तुलनात्मक अभ्यास' हा असून यामध्ये भूमी उपयोजन, कृषी भूमी उपयोजन, पीक प्रारूप, पीक केंद्रीकरण, पीक विविधता, पीक संयोग, कृषी उत्पादकता यांचाही अभ्यास केला जाणार आहे. या विषयासंबंधी अनेक शास्त्रज्ञांनी तसेच संशोधकांनी आपली अभ्यासपूर्वक मते मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

राठोड एच.बी. (२००१) यांनी 'Spatio-temporal analysis of agriculture landuse in Beed district- A Geographical Review' या विषयावर बीड जिल्ह्यातील कृषी भूमी उपयोजन आणि भौगोलिक अतिशय चिकित्सक पद्धतीने केले आहे. १९७०-१९९७ दरम्यानचे तालुकानिहाय पिकांचे उत्पादन, कल पीक विविधता, पीक संयोग, पीक केंद्रीकरण

निर्देशांक काढण्यासाठी व्हिवर, डोईज, भाटिया आणि जसबीरसिंग यांच्या पद्धतीच्या वापर केला आहे.

माळी एन.जी. (२००७) यांनी आपल्या पीएच.डी. प्रबंधात 'परभणी जिल्ह्यातील कृषी उत्पादकता : एक भौगोलिक अभ्यास' या विषयावर संशोधन केले असून कृषीवर नियंत्रण करणाऱ्या अप्राकृतिक घटकांचा भूमी उपयोजन, पीक प्रारूप, कृषी उत्पादकता व कृषी क्षमता यावर होणारा परिणाम अभ्यासण्यासाठी सन १९७०-२००० या कालावधीत वरील घटकांचा अभ्यास करून कृषी उत्पादकता व कृषी क्षमता यासंदर्भातील समस्या कोणत्या आहेत व त्यावरील उपाय सुचविले आहेत.

सुरेश फुले (१९९९) यांनी 'मराठवाडा प्रदेशाचा कृषी भूगोल' या विषयावर मराठवाड्यातील कृषीचा चिकित्सक अभ्यास केला. मराठवाडा प्रदेशाचे सामान्य भूमी उपयोजन, पिकांचे प्रारूप, उत्पादकता आणि उत्पादनाचा कल वाढला आहे. सन १९७०-७५ ते इ.स.१९९२-९५ या काळातील पिकांचे उत्पन्न आणि पीक केंद्रीकरण, पीक विविधता, पीक संयोग इत्यादी पद्धतीचा अभ्यास केला आहे.

के.आर. दिक्षीत (१९७३) यांनी 'महाराष्ट्रातील कृषी प्रदेशाचा अभ्यास' करताना पीक प्रारूपावर आधारित महाराष्ट्रातील सारखेपणावर कृषि प्रदेश सिमांकित करून त्यासाठी त्यांनी स्पिअरमन श्रेणी सहसंबंध पद्धतीचा उपयोग केला. तसेच पीक संयोग काढण्यासाठी व्हिवरच्या पद्धतीचा उपयोग केला.

एस.एल. गुप्ता (१९७१) यांनी 'हरियाणातील पीक प्रारूपाच्या अभ्यासात प्राकृतिक कारके तसेच पशूचे सहकार्य' यांचा प्रभाव सांगून पीक प्रारूपात खरीप व रब्बी या दोन पिकांचे विभाजन केले.

माजिद हुसेन (१९७१) यांनी उत्तर प्रदेशातील पीक केंद्रीकरणात व पीक प्रारूपात पिकांना योग्य क्रम देऊन नंतर प्रत्येक भागाचे पीक केंद्रीकरण लक्षात घेतले आहे.

१.११ प्रकरण योजना

प्रकरण १ ले

१.१ प्रस्तावना

१.२ कृषी आणि कृषी भूगोलाचा अर्थ

१.३ कृषीचा उगम

१.४ शेतीच्या उगमस्थाने प्रदेश

१.५ शेतीचा प्रकार

१.६ कृषी प्रारूप

१.७ अभ्यास क्षेत्र

१.८ अभ्यासाची उद्दिष्ट्ये

१.९ अभ्यास पद्धती

१.१० साहित्याचे पुनरावलोकन

१.११ प्रकरण योजना

प्रकरण २ रे

२.१ कंधार व मुखेड तालुक्याचा परिचय

२.२ कंधार व मुखेड तालुक्यातील मंडळे

२.३ प्राकृतिक रचना

२.४ मृदा

२.५ नदीप्रणाली

२.६ हवामान

२.७ वनस्पती

२.८ प्राणी

२.९ वाहतूक

२.१० उद्योग

२.११ लोकसंख्या

२.१२ शिक्षण

२.१३ पर्यटन

प्रकरण ३ रे

३.१ प्रस्तावना

३.२ भूमी उपयोग संकल्पना

३.३ जमिनीच्या उपयोगानुसार वर्गीकरण

३.४ भारतातील भूमी उपयोग

३.५ महाराष्ट्रातील भूमी उपयोग

३.६ नांदेड जिल्ह्यातील भूमी उपयोजनाचा अभ्यास

३.७ कंधार तालुक्यातील भूमी उपयोजनाचा अभ्यास

३.८ मुखेड तालुक्यातील भूमी उपयोजनाचा अभ्यास

३.९ कंधार व मुखेड तालुक्यातील भूमी उपयोजनाचा तुलनात्मक अभ्यास

प्रकरण ४ थे

४.१ प्रस्तावना

४.२ कृषीवर परिणाम करणारे घटक

४.३ कंधार तालुक्यातील पीक प्रारूप व पीक केंद्रीकरणाचा अभ्यास

४.४ मुखेड तालुक्यातील पीक प्रारूप व पीक केंद्रीकरणाचा अभ्यास

४.५ कंधार व मुखेड तालुक्यातील पीक प्रारूप व पीक केंद्रीकरणाचा तुलनात्मक अभ्यास

प्रकरण ५ वे

५.१ कंधार तालुक्यातील पीक संयोग व पीक विविधतेचा अभ्यास

५.२ मुखेड तालुक्यातील पीक संयोग व पीक विविधतेचा अभ्यास

५.३ कंधार व मुखेड तालुक्यातील पीक संयोग व पीक विविधतेचा तुलनात्मक अभ्यास

५.४ कंधार व मुखेड तालुक्यातील कृषी उत्पादकतेचा विविधतेचा तुलनात्मक अभ्यास

प्रकरण ६ वे

६.१ निष्कर्ष

संदर्भ

१) डॉ.सुरेश फुले, कृषी भूगोल, विद्याभारती प्रकाशन, मेन रोड, लातूर

२) डॉ.विठ्ठल घारपुरे, कृषी भूगोल, पिंपळापुरे पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती जून २००५

३) प्रा.एस.व्ही. ढाके व प्रा.पाटील, प्रा.भारंबे, कृषी भूगोल, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, ऑगस्ट २००३

४) डॉ.प्रदीप आगलावे, सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर, जानेवारी २००८

५) प्रा.के.एम. केचे आणि ए.बी. सवदी, भारतीय कृषी भूविज्ञान, १४३ सी, श्यामलदास गांधी मार्ग, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई, १९७९

६) डॉ.विजया साळुंके, कृषी भूगोल, सेठ पब्लिशर्स प्रा.लि., मुंबई, २००३

७) डॉ.इंदिरा सिंह, कृषी भूगोल, डिस्कव्हरी पब्लिशिंग हाऊस अन्सारी रोड, दरियागंज, नई दिल्ली

८) Majid Hussain, Agricultural Productivity of India, Vol. No.22, 1976

९) S.P. Mishra, Agriculture Productivity and It's Special, in U.P. Vol.34, 1988

संशोधक
वाघमारे गणपती शंकर

मार्गदर्शक
प्रा.डॉ.नागरगोजे अशोक उमराव